# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०५ जानेवारी,२०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)


## खाकीतील माणुस जेव्हा जागी होतो.........

एक महिण्याअगोदरच ट्राफिक ऑफिस चंद्रपुर येथिल प्रभारी अधिकारी म्हणुन कार्यभार हाती घेतलेले जयंत चव्हाण आज कार्यालयात आपल्या नियोजित वेळेच्या काही तास अगोदरच हजर झाले, निमीत्य होते ते आपल्या कार्यालयाची व आजुबाजुच्या परिसराची स्वच्छता मोहिम ! कार्यालयातिल सर्व कर्मचारी सुध्दा मोठया साहेबांच्या खांदयाला खांदा लावुन हातभार लावण्या करीता व स्वच्छतेचा पवित्रा पुर्ण करण्याकरीता कार्यालयात कंबर कसून हजर होते. सकाळची गुलाबी ठंडी आणि त्यात श्रमदान एक वेगळाच आनंद.

कंबरेमागे हाताची घडी घालुन जंयत चव्हाण कार्यालयाच्या संपुर्ण परिसराचे निरीक्षण करून श्रमदानाची विभागणी आपल्या सहका—यामध्ये करून देत होते. परिसराची पाहणी करीत असताना साहेब कार्यालयाला सुरक्षेच्या दृष्टिने घातलेल्या कंम्पाउण्ड वॉल च्या बाहेरून सुध्दा पाहणी करू लागले, तेव्हा त्यांना रस्त्याच्या कडेला व त्यांच्या कार्यालयाच्या कंम्पाउण्ड वॉलला आसरा घेउन ठंडीने कुडकुडत सत्तरीच्या आसपास असलेला वृध्द निजलेल्या अवस्थेत नजरेस पडला व जयंत चव्हाण यांची पाउले तिथेच थबकली.

अंगावरचे सर्व कपडे मळलेले तर काहीसे फाटलेले, रस्त्याच्या धुळीने संपुर्ण चेहरा व अंग काळवंडलेला, दोन तिन फाटलेल्या चादरा, एक फाटलेली बॅग व एक पिशवी जनू त्या बॅगीमध्ये व पिशवीमध्येच त्या वृध्दाचा सर्व संसार सामावेला असावा. चेह—यावर वयाची व जिवनाच्या लांब खळतळ प्रवासाची साक्ष देणारी लोंबकळत असलेली पिकलेली दाढी. बाजुलाच दोन जुने तुटलेले चप्पलीचे जोड, त्यातील एक रस्त्याच्या दिशेला तोंड करून ठेवलेली तर एक जोड उलटी करून ठेवलेली. एका व्यक्तिला दोन चप्पलीचे जोड ? जयंवत रावाच्या मनात प्रश्न निर्माण झाला. कदाचीत उटली मारलेली चप्पलेची जोड ही त्या वृध्द व्यक्तीच्या आजपर्यतंच्या जिवनाची सोबती असावी व रस्त्याच्या दिशेला तोंड करून ठेवलेली चप्पलेची जोड ही त्याच्या पुढिल जिवनाची सोबती असावी. असे आपसुकच उत्तर जयवंत रावांनी आपल्या प्रश्न पडलेल्या मनाला देउन मोकळे केले. नजरे समोर दिसत असलेल्या या सर्व पसा—यात एका फाटलेल्या चादरीवर खुल्या आभाळाच्या खाली व धरणीमातेच्या कुशीत हे वृध्द निश्चिंत झोपलेले होते. त्यांचे शरिर मात्र ठंडीला प्रतिकार करीत होते, परंतु एखादा मुणी जसा आपल्या ध्यानात मग्न असताना स्थितप्रज्ञ भासतो तशीच काहीशी मुद्रा या वृध्द व्यक्तीची सुध्दा जाणवत होती हेही तितकेच खरे...

जयवंत रावानी त्वरीत आपला मोर्चा सहका—यांकडे वळविला.. व कडक आवाजात हे वृध्द कोण...? केव्हा पासुन येथे आहेत..? कुठले आहेत..? कोठून आलेले...? अस्या

अनेक प्रश्नाचा भडीमार त्यांनी काही सेंकदाच आपल्या सहका—यांवर केला. साहेबांचा कडक आवाज व त्यातही हे यक्षप्रश्न! सहका—यांची पुरती तारांबळ उडाली.. कारण या सर्व अनुत्तरीत प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न त्यांनी सुध्दा केलेला होता परंतु ते दुर्देवाने त्यात अपयशी ठरलेले होते. संसदेत चालावा तसा जयवंत रावांचा झिरो अवर संपल्यावर एवढेच तथ्य समोर आले की, हे वृध्द मागिल काही वर्षापासुन येथेच आपले बस्तान मारून आहेत. लोंकानी दिलेल्या अन्नावर यांचा उदरनिर्वाह चालु असुन काही वेळेस हे भिक्षा सुध्दा मागताना दिसुन आले आहेत.

जयवंतराव हताश झाले. कोण कुठला देवजाने परंतु का कळेणा त्या वृध्द व्यक्तीबद्दल अनामिक जिव्हाळा जयवंतरावाच्या मनात घर करून गेला. आपण स्वच्छता मोहीमेचा प्रारंभ करणार आहोत, आपले कार्यालय, आपले परिसर आपण स्वच्छ करणार आहोत, परंतु त्या आधी जर आपण आपल्या कार्याची सुरवात मानवसेवा व समाजसेवा म्हणुन या वृध्द व्यक्तीला स्वच्छ करून केली तर किती छान होईल असा निर्धाण त्यांनी आपल्या मनाशी बांधला व आपल्या निर्धारात त्यांनी आपल्या सहका—यां सुध्दा सामिल करून घेतले.

कार्याचा सुभारंभ झाला. त्या वृध्द व्यक्तीला रस्त्यावरून उठवुन कार्यालयाच्या परिसरात आण्यात आले. सुरवात वृध्द आजोबाचे वाढलेले केस कापण्या पासुन सुरू करण्याचे ठरले. सलुनवाल्या भाउंचे आगमन झाले. आजोबांचे डोक्यावरील केस, दाढी सपाचट करून मिशीला छान आकार देण्यात आला. नंतर आंघोळीची व्यवस्था करण्यात आली तब्बल चार साबना झिजवून आजोबांची कांती उजळविण्यात आली. आजोबा एकदम टवटवीत दिसु लागले, जयवंत राव येथेच थांबले नाही तर त्यांनी आजोबांच्या आंघोळीनंतर नविन कपडयाची पण व्यवस्था केली. काही वेळापुर्विचा व आतच्या त्या वृध्द व्यक्तीचा कायापालट सर्वांचा नजरलेला सुखावनारा होता. आजोबांना सुर्याच्या कोवळया उन्हात एका खुर्चित बसविण्यात आले. आजोबांकरीता सकाळच्या न्याहारीची व्यवस्था करण्यात आली. आजोबांच्या स्वच्छतेचे कार्य येथे संपले होते व आपण केलेल्या मानवसेवेचे समाधान सर्वांच्या चेह—यावर स्पष्ट दिसत होते.

आजोबांची न्याहारी सुरू होती व जयवंतराव व त्यांचे सहकारी केलेल्या कार्याच्या आनंदात आजोबांच्या खुर्चि भोवतीच घोळका घालुन कार्यालयाच्या स्वच्छतेच्या कामाची मध्येच राहलेली योजना आखत उभे होते. आजोबांचा हा कायाकल्प केल्यानंतर आपल्या सहाका—यांना शाब्बासकी म्हणुन त्यांचे तोंड गोड करावे कदाचित या हेतूने का असावे म्हणुन जयवंतरावांनी सर्वा करीता चहाची ऑडर केली. रस्त्याच्या पलीकडे असलेल्या चहावाल्या कांकाना चहाचा निरोप धाडण्यात आला. काही मिनिटानंतर चहावाले काका आपली चहाची गरम कॅटली हलवत कार्यालयात दाखल झाले. सर्वांना चहा वाटप

करण्यात आला. आजोबांची न्याहारी सुध्दा आटोपलेली होती म्हणून जयवंतरावांनी आजोबांना सुध्दा चहा देण्यात यावा म्हणुन फर्माण सोडला. चहावाले काका आपल्या कॅटलीसह आजोबांच्या खुर्चिकडे वळले तसेच विस्फरलेल्या डोळयांनी ते तिथेच स्तब्ध झाले. जयवंतरावांनी कुतूहलाने चहावाल्याला विचारले, 'काय रे काय झाले'...? तेव्हा चहावाला उद्गारला, 'अररररे... हा तर तुकाराम' ....! सर्वांच्या नजरा एकदम चहावाल्यावर खिळल्या.. सर्वलोक कुतूहलाने चहावाल्या कडे सरसावले... जयवंतराव एकदम चकित झाले. त्यांनी लगेच चहावाल्याला विचारले, 'तु ओळखतो याला'.. ? चहावाला बोलु लागला, 'हो साहेब, मि ओळखतो याला व तुमच्या डिपार्टमेंन्टचे रिटायर्ड झालेले बरेच लोक सुध्दा हयाला चांगल्या त—हेने ओळखत असतिल'.. 'हा तुकाराम नाकाडे'.. 'याचे इस्तरीचे दुकान होते तिसेक वर्षा अगोदर. आणि हे दुकान तुमच्या कार्यालयाला लागुनच होते'. 'सर्व पोलीसवाल्यांचे कपडे हाच इस्तरी करून दयायचा साहेब'. जयवंतरावांचा आनंद गगणात मावेनासा झाला. चहावाल्याच्या रूपाने जनू देवच त्यांच्या समोर आला की काय असा भास त्यांना होत होता.. सर्व कर्मचारी सुध्दा आनंदित झाले सकाळ पासून ते ज्या अनोळखी इसमाच्या सेवेत निस्वार्थ पणे गुंतलेले होते तो आता अनोळखी नव्हता.

चहावाल्याने दिलेल्या माहितीवरून ते वृध्द आजोबां बंगाली कॅम्प परिसरात त्या काळात वास्तव्यास होते व त्यांना एक मुलगी सुध्दा होती. जयवंतरावा करीता एवढी माहीती पुरेसी होती शेवटी पोलीसच ते. त्यांनी आपली यंत्रणा कामी लावली व त्या वृध्द आजोबांच्या घराचाच नव्हे तर त्यांचा मुलीचा सुध्दा शोध घेतला. वृध्द आजोबांच्या मुली करीता स्पेशल दिव्याची सरकारी गाडी पाठविण्यात आली. आजोबांची मुलगी कार्यालयात दाखल झाली तीला घडलेले सर्व रामायण सांगण्यात आले व ब—याच वर्षापासुन तिच्या पासुन दुर निघुन गेलेल्या तिच्या वडीलांची भेट तिला करून देण्यात आली. तो क्षण खरच उपस्थित सर्वाच्या हृदयाला हेलावणारा होता.. सर्व स्तब्ध त्या बाप—लेकीच्या अवति भोवती उभे होते व ते अविस्मरणीय क्षण आपल्या स्मृतीत कायमचे सामावून घेत होते...

अखेर त्या वृध्द आजोबांना त्यांच्या मुली सोबत तिच्या घरी रवाना करण्याची वेळ आली, पुन्हा त्या दिवा लागलेल्या त्या सरकारी गाडीत वृध्द आजोबाची सवारी परतिच्या दिशेकडे निघाली. कार्यालयातील गेटच्या वळणावर गाडी जेव्हा थोडी सावकाश झाली तेव्हा त्या वृध्द आजोबांनी गाडिच्या खिडकितून आपली मान अलगद बाहेर काढित थोडे स्मित हास्य करीत जयवंतरावां कडे आपला दृष्टिक्षेप टाकला.......व तिथेच जयवंत चव्हाण यांचे डोळे पाणावले...........

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

नेहमी कादंब–यामध्ये किंवा पिक्चर मध्ये, मोठया परदयावरच दिसणारे हे दृश्य जेव्हा ख–या आयुष्यात घडतात तेव्हा खरच शब्द अपुरे पडतात....बस्स एकच म्हणावे असे वाटते.. जेव्हा खाकितील माणुस जागा होतो तेव्हा कायाकल्पच होतो.........धन्यवाद!

---